महाराष्ट्र शासन

जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय पालघर

प्रशासकीय अ इमारत, पालघर बोईसर रोड, कोळगाव ता.जि.पालघर

दुरध्वनी :९०११३३५३६८ ईमेल - palgharddcahd@gmail.com

जा.क्र जिपऊ /औषध खरेदी / 688 /२०२६ दि.31/08/2026

प्रति,
मा. आयुक्त पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७
(योग्य मार्गाने सादर)

विषयः पशुवैद्यकीय चिकित्सालय व पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक औषध व यंत्र सामुग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यासाठी दरपत्रक सूचना प्रसिद्ध करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करण्यात येते की, जिल्ह्यातील पशुवैद्यकीय चिकित्सालय व पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक औषध व यंत्र सामुग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रक सूचना https://**ahd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर दि.३१/०८/२०२६ पासून दि.०९/०९/२६ पर्यंत प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

सोबतः प्रसिध्दी करावयासाठी यादी व दरपत्रक सूचना

उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
पालघर

प्रत :

१. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,कोकण विभाग,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर .

यंत्र सामुग्री व कार्यालयीन खर्च सन २०२६-२७

Sr No	Name of Item	Packing /Specifications
1	BUN	4×25ml
2	Creatinine	200 ml
3	SGOT	4×25ml
4	SGPT	4×25ml
5	Billirubin	200 ml
6	Calcium	50×1 ml
7	Phosphorus	2×25ml
8	Yellow Tips	1×1000
9	Blue Tips	1×500
10	White Tips	1×500
11	Vaccutainer clot activater 3.5 ml	100
12	EDTA collection tube 3ml	100
13	Non Sterile Latex Gloves	100×1
14	Scalp Vein -22 G	100
15	Scalp Vein -24 G	100
16	Cotton 500gm	1
17	Ethanol Hand Sanitizer 100 ml	100 ml×1
18	Micropipette Vol. range 0.5 -10 ul	1
19	Micropipette Vol. range 5- 50 ul	1
20	Micropipette Vol. range 10 -100 ul	1
21	Micropipette Vol. range 100 -1000 ul	1
22	Micropipette Vol. range 20 -200 ul	1
23	Syringe 2.5 ml with Needle	100
24	Syringe 5.0 ml C Needle	100
25	Ria Tube	1× 100
26	Microcentrifuge tubes	1× 100
27	Test tubes 1.5ml	1× 100
28	Nebulizer	For Small Animals
29	Operation kit	For Small Animals
30	Sterilizer Drum	Medium Size
31	Oil immersion	100 ml×1
32	Leishman & Giemsa	500 ml
33	Catgut	All Sizes
34	Metal detector	
35	Infra Red light	
36	Cautri	
37	Haematological Blood Analyser	5 Part for Veterinary Use
38	Biochemical Analyser	Latest Technology for Veterinary Use
39	Office table	5*4 ft
40	Revolving Chair	For Office Use
41	Apron / Scrubs	Medium , Large, Extra Large
42	Office Chair	For Office Use

District Deputy Commissioner
of Animal Husbandry Palghar

सर्व इच्छुक आणि प्रामाणिक उत्पादक, विक्रेता, वितरक, किरकोळ विक्रेता

विषय: पशुवैद्यकीय चिकित्सालय व पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक औषध व यंत्र सामुग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यासाठी दरपत्रक देणेबाबत....

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, पशुवैद्यकीय चिकित्सालय व पशुवैद्यकीय संस्थांना आवश्यक औषध व यंत्र सामुग्री खरेदी करण्यासाठी इच्छुक आणि प्रामाणिक उत्पादक, विक्रेता, वितरक, किरकोळ विक्रेता पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तपशीलवार सूचनेसाठी https://ahd.maharashtra.gov.in किंवा https://palghar.nic.in या संकेतस्थळाला भेट द्या.

१. **जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना आवश्यक औषध व यंत्र सामुग्रीचा** पुरवठा करण्यासाठी दरपत्रकाच्या तपशीलवार अटी आणि शर्ती वरील संकेतस्थळावर किंवा जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन कार्यालय, जिल्हा पालघर यांचे कार्यालयात ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून दि.३१/०८/२०२६ पासून दि.०९/०९/२६ पर्यंत सुट्टीचा दिवस सोडून उपलब्ध आहेत.

२. इच्छुक आणि प्रामाणिक उत्पादक, विक्रेता, वितरक, किरकोळ विक्रेता या पुरवठादाराकडून दरपत्रके सादर करताना GST क्रमांक देणे बंधनकारक राहील. GST क्रमांक नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावीत व पॅनकार्ड ची प्रत सोबत जोडावी.

३. सदर दरपत्रके दि.३१/०८/२०२६ पासून दि.०९/०९/२६ पर्यंत संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात स्वीकारण्यात येतील व दिनांक १०/०९/२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता या कार्यालयात खरेदी समितीच्या समोर उघडण्यात येणार आहेत.

सदर खरेदी प्रक्रियेअंती फक्त पात्र दरपत्रकधारकांनी सादर केलेल्या किंमतीची दरपत्रके विचारात घेऊन सर्वात कमी दर सादर करणाऱ्या दरपत्रकधारकाची निवड करण्यात येईल.

काहीही कारणे न देता दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार हे खाली सही करणार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
पालघर

-: जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना आवश्यक औषध व यंत्र सामुग्रीचा खरेदीसाठी दरपत्रक अटी व शर्ती :-

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर हे इच्छुक आणि प्रामाणिक उत्पादक, विक्रेता, वितरक, किरकोळ विक्रेता पुरवठादाराकडून **जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना आवश्यक औषध व यंत्र सामुग्रीचा** खरेदीकरण्यासाठी विहित नमुन्यात दरपत्रक मागवीत आहेत. सर्व आवश्यक कागदपत्रासह भरलेली दरपत्रके दि.३१/०८/२०२६ पासून दि.०९/०९/२६ पर्यंत संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात स्वीकारण्यात येतील.

सर्वसाधारण माहिती व अटी शर्ती :

खालील नियम व अटी शर्तीची दरपत्रकधारकाने नोंद घ्यावी

१. दरपत्रक सोबत दिलेल्या नमुन्यातच सादर करावे.

२. दरपत्रक बंद लिफाफ्यात सादरकरावे व लिफाफ्यावर पालघर **जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना आवश्यक औषध व यंत्र सामुग्रीच्या** पुरवठ्यासाठी दरपत्रक असे लिहावे,

३. अटी व शर्तीनुसार सादर न केलेले, परिपूर्ण नसालेले व सील न केलेले दरपत्रक तसेच नियोजित तारीख व वेळेपूर्वी प्राप्त न झालेले दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

४ . दरपत्रक सादर करणाऱ्या दरपत्रकधारकाने खरेदी प्राधिकार्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसलेबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देणेबाबत हमी देणे आवश्यक,

५. दरपत्रक सादर करणाऱ्या दरपत्रकधारकाने दरपत्रकासाठी नमूद केलेल्या अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे पत्र देणे आवश्यक,

६. दरपत्रकधारकाने दरपत्रके सादर करताना GST क्रमांक देणे बंधनकारक राहील. GST क्रमांक नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या दरपत्रकधारकाच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे व पॅनकार्डची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.

७. दरपत्रकधारकाने उत्पादकाचा उत्पादन करणेसाठी भारतीय मानक ब्युरोने अदा केलेला परवाना सादर करणे आवश्यक राहील.

८. सदर दरपत्रके दिनांक १०.०९.२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा पालघर यांच्या कार्यालयात खरेदी समितीच्या समोर उघडण्यात येतील.

९. दरपत्रकातीलदर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून दि.३१/०३/२०२७ पर्यंत वैध राहतील.

१०. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांनी कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे वा रद्द करण्याचे किया पुरवठा आदेश नाकारण्याचा अधिकार राखून ठेवले आहेत.

११. दरपत्रकात दिलेला दर सर्व करांसहीत व शुल्कासह (उदा. बॅट, सिएसटी, जीएसटी, वाहतूकाखर्थ, हमाली, इत्यादी) देण्यात याचा. या कार्यालयकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.

१२. दरपत्रक धारकाने पुरवठा आदेश जारी केल्यापासून ७ दिवसाच्या आत नुकतेच उत्पादित केलेले व किमान २ वर्ष वैधता असलेले **जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना आवश्यक औषध व यंत्र सामुग्रीचा** पुरवठा चांगल्या स्थितीत पुरवठा केला पाहिजे.

१३. **औषध व यंत्र सामुग्रीचा** पुरवठा झाल्या नंतरच देयक धनाकर्षाद्वारे / एनइएफटी द्वारे अदा करण्यात येईल.

१४. दरपत्रक मंजूर झालेल्या पुरवठादाराच्या बिलामधून शासकीय नियमाप्रमाणे २ % IDS व २% GST कपात केला जाईल.

वरील सर्व (१ ते १३) अटी व शर्ती मला मान्य आहेत.

जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
पालघर

औषध खरेदी सन २०२६-२७

Sr No.	Name Of Item	Specifications
1	Probiotics susp.	For oral use
2	Liver tonics (Oral)	For oral use
3	Ecbolics	Oral/Suppositories
4	Ruminal tonics	For oral use
5	Anti bloat medicines	For oral use
6	Diruetics	For oral use
7	Oral Ayurvedic Anti Diarrhoeal drugs	For oral use
8	Oral Post partum management preparations	For oral use
9	Oral Vitamin B complex	For oral use
10	Oral B1 and B6	For oral use
11	Bandage cloth	All size
12	Anti snake Venom	For oral use
13	Liq.Multivitamin	For oral use
14	Oral Liver tonics	For oral use
15	Vit.AD3, E and Selenium	For oral use
16	Iodine Ointment	For oral use
17	Topical Spray	For oral use
18	Liq. Calcium	For oral use
19	Inj.Xylazine	For oral use
20	Oral Multivitamin and Multimineral preparations	For oral use
21	Pregnancysafe dewormers	For oral use

District Deputy Commissioner
of Animal Husbandry Palghar